# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २४/०१/२०२५ (शुक्रवार) सकाळ


## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन वेलतूर** :—दिनांक २२/०१/२०२५ रोजी पोस्टे वेलतूर येथील स्टाफ पोस्टे हददीत पेट्रोलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा बोरी सदाचार शिवार येथे ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा बोरी सदाचार शिवार येथे ट्रॅक्टर MH 40 BJ 6626 चा मुंडा व ट्रॉली क्र MH-36-G-2538 हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रॅक्टर चालक **आरोपी नामे दिपक अंबाजी पोपटे वय ४२ वर्ष रा मांढळ ता. कुही जि. नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर ट्रॉली मधुन १) ०१ ब्रास रेती किंमती ५००० /— रूपये आणि २) ट्रॅक्टर MH 40 BJ 6626 चा मुंडा अंदाजे किं. ४,००,०००/— रू. व ट्रॉली क्र. MH-36-G-2538 अं. किं. १,००,०००/—रू. असा एकुण ५,०५०००/—रूपयाचा मुदेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून आरोपी चालक दिपक अंबाजी पोपटे वय ४२ वर्ष रा मांढळ ता. कुही जि. नागपुर याचेविरूद्ध पोस्टे वेलतूर येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.स. सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधि. १९५७ सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहींता १९६६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.



**रात्रगस्त दरम्यान, ऑल आउट मोहीम आणि कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक,मोहीमे दरम्यान एन.डी.पी.एस. कायदयान्वये आणि दारूबंदी कायदयान्वये गुन्हा नोंद.**

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने पोलीस स्टेशन पारशिवनी हद्दीत दिनांक २३/०१/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २४/०१/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान दत्तटेकडी पारशिवनी टाउन आणि नयाकुंड या परीसरात ऑल आउट मोहीम आणि कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. कोबींग ऑपरेशन हे उपविभागिय पोलीस अधिकारी रामटेक उपविभाग श्री रमेश बरकते यांचे नेतृत्वात राबविण्यात आले. सदर मोहीमे करीता पोलीस स्टेशन पारशिवनी चे पोलीस निरीक्षक श्री राजेशकुमार थोरात ,पोउपनि शिवाजी भताने,हिम्मत राठोड पोलीस हवालदार मुदस्सर जमाल, पोलीस अंमलदार राकेश बंदाटे, सुरज मोहेकर, वीरेंद्र सिंग चौधरी, पृथ्वीराज चव्हाण, चालक पोलीस हवालदार अनिल देशमुख आणि आरसीपी क्र १ पथकाचे अंमलदार असे हजर होते. कोंबींग ऑपरेशन दरम्यान पोलीस स्टेशन पारशिवनी हददीत दत्तटेकडी पारशिवनी टाउन आणि नयाकुंड भागात पेट्रोलींग केली. तसेच त्या भागातील रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. विविध पथक नेमून वेगवेगळ्या ठिकाणी रेड्स तसेच वॉरंट बजावणी, करण्यात आली आहे. सदर मोहीमे दरम्यान खालील प्रमाणे कारवाई करण्यात आल्या आहे.

१. ऑल आउट मोहीम आणि कोबींग ऑपरेशन दरम्यान **मंगेश कृष्णाजी मोहनकर वय ३६ वर्ष राहणार नयाकुंड ता पारशिवनी** याचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता त्याच्या घरी बेडरूम मधील सज्जावर पन्नीमध्ये १४० ग्रॅम गांजा किमती १४००/—रुपयांचा मुद्देमाल अवैधरिता मिळून आल्याने मुददेमाल जप्त करून त्याचेवर कायदेशीर कार्यवाही करून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम ८ (क), २० (४) एन.डी. पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

२. आरोपी **संतोष लक्ष्मण मेश्राम, रा नयाकुंड ता पारशिवनी** याचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता त्याचे घरातुन एकुण ५ प्लॉस्टीक चे बॉटल मोहाफुल दारूने भरलेल्या प्रत्येकी ०१ लिटर क्षमतेच्या एकुण ५ लिटर गावठी दारू प्रतिलिटर किंमती १०० /— रू प्रमाणे एकुण ५००/— रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आाला असुन आरोपीवर ६५ ई म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**